# प्रकरण सहावे

# प्रकरण सहावे

# सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

## ६.१ सारांश

### १ प्रस्तावना

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास विषय आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास हा आहे. या संशोधनामध्ये प्रामुख्याने आरोग्य शिक्षण, ग्रामीण भाग, पौगंडावस्था, पौगंडावस्थेतील मुली व जीवन कौशल्य या ५ घटकांचा अभ्यास केला गेला आहे.

### २ संशोधन समस्या-

**आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन विषयक कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.**

### 3 संशोधनाची गरज -

व्यक्ती व्यक्तीचा विकास करुन विकसित समाजाचे साध्य गाठणे, हे शिक्षणाचे उद्दिष्ट. व्यक्ती विकासात तिच्या ज्ञानाचा, भावनांचा, शरीराचा विकास अपेक्षित आहे. संस्कार संपन्न सुजाण व सामर्थ्य संपन्न नागरिक देशाला देणे व देश सामर्थ्य संपन्न बनविणे हे शिक्षणाचे राष्ट्रीय उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकासामध्ये अडथळे निर्माण करणाऱ्या समस्यांचा शोध घेऊन त्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राष्ट्राच्या विकासामध्ये

अडथळे निर्माण करणाऱ्या अनेक समस्या आहेत, त्यापैकी महत्त्वाची समस्या म्हणजे किशोरावस्थेतील मुला मुलींच्या समस्या होय. जगातील आजची युवाशक्ती उज्वल भविष्याच्या उंबरठयावर उभी आहे. संख्येने कोटयावधीच्या पुढे असलेली आजची पिढी, त्यातील विशेषत: १० ते १९ वयाची पिढी इतिहासात प्रथमच एवढया मोठ्या संख्येने बाल्यावस्थेतून प्रौढत्वाकडे मार्ग संक्रमण करीत आहे. किशोरावस्था हा गतिमान परिवर्तनाचा वादळी कालखंड मानला जातो. शारिरीक, मानसिक, भावनिक व सामाजिक वर्तनाबद्दल अपरिहार्यतेने घडत असतात. पण त्या संबंधीची माहिती किशोरांना पुरेसी व योग्य नसते. त्यामुळे विविध समस्यांना किशोरवयीन मुलामुलींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्याच्या समायोजनात अडथळे निर्माण होतात. योग्य वेळी योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने ही मुले मार्ग चुकतात, भरकटली जातात, व्यसनांच्या आहारी जातात.

आज जगामध्ये ज्या काही गंभीर स्वरुपात समस्या दिसतात त्या सर्व समस्यांचे मुळ ही पौगंडावस्था आहे. पौगंडावस्थेत मुलांमध्ये अनेक शारीरिक, मानसिक, भावनिक बदल घडून येतात. हेच बदल अनेक समस्यांना कारणीभूत ठरतात. असे म्हटले जाते की **Prevention is better than cure.** एखादी समस्या निर्माण झाल्यानंतर ती समस्या दूर करण्यासाठी अशा प्रकारचे उपचार करण्यापेक्षा समस्याच निर्माण होऊ नये म्हणून प्रयत्न करणे हे अधिक हितावह म्हणूनच संशोधकाने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे. आजची किशोरावस्थेतील पिढी ही उद्याचे देशाचे भविष्य आहे. या वयातील मुला मुलींच्या ठिकाणी जर जीवन कौशल्य रुजली तर ही मुले पुढे जावून देशाचे आदर्श नागरिक बनतील व देशाचे भवितव्य घडवतील. ही कौशल्ये रुजवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याची गरज आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये पौगंडावस्थेतील मुलींच्या समस्यांचा अभ्यास केला जाणार आहे. त्याचा परिणाम म्हणून पुढील पिढीतील मुलींचा योग्य पध्दतीने विकास होण्यास हे संशोधन सहाय्यभूत होईल. त्यांच्या कौशल्यांचा उपयोग भावी पिढीला अधिक उत्तम प्रकारे होईल व ती पिढी अधिक जागृत समंजस व संस्कार संपन्न घडेल असा विश्वास वाटतो.

त्याच प्रमाणे संशोधनासाठी पुढील घटकांचाही अंर्तभाव प्रकरण एक मध्ये करण्यात आला आहे. ते पुढील प्रमाणे -

**१) संशोधनाची उद्दिष्टे**

**२) गृहिते**

**३) परिकल्पना**

**४) व्याप्ती व मर्यादा**

**५) शीर्षकातील संज्ञा व संकल्पनांच्या व्याख्या**

**६) संशोधन अभ्यासाचे महत्त्व**

**वरील घटकांचा प्रकरण एक मध्ये अंर्तभाव करण्यात आला आहे.**

## ४ संबंधीत साहित्य व संशोधनांचा आढावा -

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने संदर्भ साहित्य व संशोधनांचा आढावा दोन भागांमध्ये घेतला आहे. ते पुढील प्रमाणे -

### *१ संबंधीत साहित्याचा आढावा -*

मागील प्रकरणात सूचित केल्याप्रमाणे पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. या वयोगटातील मुला मुलींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. सद्यःस्थितीत या समस्येचा सर्व बाजूंनी अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक असणारी माहिती काही पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, हस्तपुस्तिका संशोधीकेने संदर्भ साहित्य म्हणून वापरले आहे.

### २. *संबंधीत संशोधनांचा आढावा -*

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने निवडलेल्या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा

अभ्यास या विषयाच्या संदर्भातील संशोधनांचा आढावा दुसऱ्या प्रकरणात घेतला आहे. हा आढावा घेत असतांना आरोग्य शिक्षण, ग्रामीण भाग, पौगंडावस्था पौगंडावस्थेतील मुली व जीवन कौशल्य या ५ घटकांचा विचार केला आहे. संदर्भ म्हणून वापरलेल्या संशोधनांचा संशोधिकेला प्रस्तुत संशोधनाची पद्धती, अभिकल्प, न्यादर्श, संशोधनाची उद्दिष्टे, परिकल्पना,गृहिते, संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी लिहित असतांना अतिशय उपयुक्त ठरले.

## ५. संशोधन पध्दती

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन पध्दती,अभिकल्प, संशोधन साधने,या घटकांचा अंर्तभाव झाला आहे.

**१) सर्वेक्षण पद्धती -**

प्रस्तुत संशोधनात ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या ठिकाणी आरोग्य विषयक जाणीवा कितपत आहेत, याचा शोध घेणे महत्त्वाचे होते.म्हणून वर्तमान परिस्थिती विषयी सखोल माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला गेला.

**२) प्रायोगिक पद्धती -**

प्रस्तुत संशोधनामध्ये आरोग्य जाणीवविषयक उपक्रम या स्वाश्रयी चलाचा जीवनकौशल्य संपादन या आश्रयी चलावर होणारा परिणाम संशोधिकेला अभ्यासायचा होता.

म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने प्रायोगिक पद्धतीची निवड केली आहे.

## ६. प्रायोगिक अभिकल्पाची निश्चिती

प्रस्तुत संशोधनासाठी यादृच्छिक निवड - दोन गट पूर्व उत्तर चाचणी अभिकल्प या

समानगट अभिकल्पाची निवड करण्यात आली. दोन गटांची निवड यादृच्छिक पध्दतीने करण्यात आली. दोन्ही गट समतुल्य करण्यासाठी इयत्ता ८वी च्या वर्गात मिळविलेल्या गुणांचा

वापर करण्यात आला. तसेच दोन्ही गट समतुल्य करण्यासाठी एक चाचणी ही घेण्यात आली. दोन्ही गट समतुल्य झाल्यनंतर लॉटरी पध्दतीने ते गट प्रायोगिक व नियंत्रित या दोन गटामध्ये विभागले गेले. त्यानंतर दोन्ही गटांना जीवन कौशल्य विषयक पूर्व चाचण्या देण्यात आल्या. त्यानंतर केवळ प्रायोगिक गटावरच आरोग्य जाणीवविषयक उपक्रम राबविले . नियंत्रित गटाला या उपक्रमांच्या मात्रेचा अभाव होता. त्या पुन्हा दोन्ही गटांना जीवन कौशल्य विषयक उत्तर चाचण्या देण्यात आल्या.

## ७. संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने माहिती संकलनासाठी निवडलेली साधने पुढीलप्रमाणे

१. **मुलाखत तंत्र.**

२. **प्रश्नावली.**

३. **मतावली.**

४. **जीवन कौशल्य विषयक चाचणी.**

५. **श्रेणी.**

त्याच प्रमाणे संशोधनासाठी वापरलेली संख्याशास्त्रीय साधने पुढील प्रमाणे

१. **शेकडेवाडी.**

२. **t - मूल्य.**

अशा प्रकारे वरील साधनांचा वापर प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात आला.

## ८. न्यादर्श निवड

प्रस्तुत संशोधनासाठी माध्यमिक स्तरावरील इ.९ वी च्या एकूण २८ विद्यार्थिनींची निवड केली. तसेच ग्रामीण भागातील इ.९ वी च्या वर्गाला पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन हा कार्यक्रम राबविणाऱ्या ५ शिक्षकांची प्रस्तुत संशोधनासाठी निवड करण्यात आली. प्रस्तुत

संशोधनाची न्यादर्श निवड करताना यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात आला.

## ९. उपक्रमांची निवड व उपक्रमांचे विकसन व कार्यवाही -

संशोधिकेने संशोधनासाठी इ.९ वी च्या विद्यार्थिनींची क्षमता लक्षात घेवून आरोग्य जाणीव विषयक उपक्रम तयार केले, व या उपक्रमांची तज्ञ डॉक्टर, तज्ञ प्राध्यापक व तज्ञ शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली निवड केली. त्यानंतर हे उपक्रम प्रायोगिक गटावर राबविण्यात आले.

## ६.२ निष्कर्ष -

***६.२.१ शिक्षकांच्या प्रश्नावलीवरुन केलेल्या अर्थनिर्वचनावरुन* काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणे-**

१) ग्रामीण भागातील शाळामध्ये आरोग्य शिक्षण हा विषय शिकविला जातो.

२) पौगंडावस्थेतील मुलींमध्ये होणा-या बदलामुळे त्याच्यात अस्थिरता निर्माण होते.

३) पौगंडावस्थेतील मुलींच्या आरोग्य संवर्धनाविषयी पालकामध्ये कमी प्रमाणात जागृतात आढळून आली.

४) शाळेतून राबविल्या जाणा-या पौगंडावस्थेतील आरोग्य संवर्धन या कार्यक्रमातून दिल्या जाणा-या लैगिंक शिक्षणाला पालकांचा मोठ्या प्रमाणावर विरोध असल्यामुळे हा कार्यक्रम राबविताना शाळेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

***६.२.२ प्रयोगावरुन केलेल्या अर्थनिर्वचनावरुन* काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणे-**

**१) स्वत्वाची जाणीवविषयक जीवन कौशल्य प्रायोगिक गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य **४.५६** हे नमुना टी-मूल्य २.७७ त्यापेक्षा अधिक आहे म्हणून ०.०१ सार्थकता स्तरावर प्राप्त टी मूल्य सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या वयात येताना या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना त्यांच्यात होणा-या शारीरिक, मानसिक,भावनिक बदलाची जाणीव झाल्याने त्याच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

३. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या प्रयोगामुळे प्रायोगिक गटातील मुली स्वतःबद्दल व स्वतःच्या प्रश्नाबद्दल शिक्षकांशी आई - वडीलांशी मुक्त विचार करु लागल्या. आपल्या समस्या मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी त्या सखोल विचार करु लागल्या, त्यामुळे त्यांच्या पूर्व चाचणी संपादनापेक्षा उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

४. प्रायोगिक गटातील मुली प्रयोगामुळे विशिष्ट प्रकारचे भय दूर करण्यासाठी सखोल विचार करु लागल्याने त्यांच्यात असणाऱ्या भयगंड,लाजाळूपणा व बुजरेपणा, कसे सांगू, कुणाला सांगू या वृत्तीत बदल झाल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली म्हणून ही वाढ प्रयोगाच्या मात्रेमुळे झाली असे आढळले.

५. प्रायोगिक गटातील मुलींना स्वतःचे मुल्यमापन करायला प्रवृत्त करणारी एक प्रश्नावली दिल्याने या मुलींना स्वतःच्या बाबतीत विचार करण्याची, व योग्य-अयोग्याची चिकित्सा करुन निवड करण्याची संधी मिळाल्याने त्याच्या उत्तर चाचणी संपादनात वाढ झाली.

६. प्रयोगामध्ये दिलेल्या प्रश्नावलीच्या अनुरोधाने स्वतःला पडताळून पाहत स्वतःतील भावना, आवडी - निवडी यांच्यात योग्यरीतीने बदल घडवून आणण्यास सतत प्रयत्नशील राहिल्याने प्रायोगिक गटातील मुलींच्या उत्तर चाचणी संपादनात पूर्वचाचणी संपादनापेक्षा अधिक वाढ झाली.

७. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या Swot Analysis या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना परस्पर संवादातून, चर्चेतून गुण - दोष म्हणजे काय, गुणांचे दोषात व दोषांचे गुणात रुपांतर कसे होते. तसेच गुण दोषातून निर्माण होणाऱ्या संधी व धोके यांची जाणीव झाल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनात पूर्वचाचणी संपादनापेक्षा अधिक वाढ झाली.

८. प्रायोगिक गटाला दिलेल्या मात्रेमुळे प्रायोगिक गटातील मुली या स्वतःतील गुण - दोष पडताळू लागल्या, गुण - दोषांची वर्गवारी करु लागल्या गुणांची वृद्धी व दोषांची निवृत्ती करण्यासाठी विचार करु लागल्याने, सतत प्रयत्नशील राहिल्याने त्यांच्या पूर्वचाचणी संपादनापेक्षा उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

**२) स्वत्वाची जाणीवविषयक जीवन कौशल्य नियंत्रित गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य (०.५८) हे नमुना टी मूल्यापेक्षा (२.७७) कमी आहे. म्हणून ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक नाही. म्हणून वरील शून्य परिकल्पना स्विकारावी लागली .

२. नियंत्रित गटाच्या स्वत्वाची जाणीवविषयक जीवन कौशल्य पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मध्यमानातील फरक सार्थक नसल्याने नियंत्रित गटाला आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या मात्रेचा अभाव असल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली नसल्याचे आढळते.

**3) स्वत्वाची जाणीवविषयक जीवन कौशल्य प्रायोगिक गट व नियंत्रित गट उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य ४.५६ हे नमुना टी मूल्य २.६८ पेक्षा अधिक आहे म्हणून ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला .

२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या वयात येताना या आरोग्य विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना त्यांच्यात होणा-या शारीरिक, मानसिक,भावनिक बदलाची जाणीव झाल्याने त्या मुली स्वतःबद्दल शिक्षकांशी, आई - वडीलांशी मुक्त विचार करु लागल्या, आपल्या समस्या मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी त्या सखोल विचार करु लागल्या, विशिष्ट प्रकारचे भय दूर करण्यासाठी त्या सखोल विचार करु लागल्याने त्यांच्यात असणाऱ्या भयगंड,लाजाळूपणा व बुजरेपणा, कसे सांगू, कुणाला सांगू या वृत्तीत बदल झाल्याने नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

३. प्रायोगिक गटातील मुलींना स्वतःचे मुल्यमापन करायला प्रवृत्त करणारी एक प्रश्नावली दिल्याने या मुलींना स्वतःच्या बाबतीत विचार करण्याची व योग्य - अयोग्याची चिकित्सा करुन निवड करण्याची संधी मिळाल्याने, प्रश्नावलीच्या अनुरोधाने स्वतःला पडताळून पाहत स्वतःतील भावना, आवडी - निवडी यांच्यात योग्यरीतीने बदल घडवून आणण्यास सतत प्रयत्नशील राहिल्याने नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

४. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या Swot Analysis या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना परस्पर संवादातून, चर्चेतून गुण - दोष म्हणजे काय, गुणांचे दोषात व दोषांचे गुणात रुपांतर कसे होते, तसेच गुण दोषातून निर्माण होणाऱ्या संधी व धोके यांची जाणीव झाल्याने प्रायोगिक गटातील मुली या स्वतःतील गुण - दोष पडताळू लागल्या, गुण - दोषांची वर्गवारी करु लागल्या व गुणांची वृद्धी व दोषांची निवृत्ती करण्यासाठी विचार करु लागल्याने, सतत प्रयत्नशील राहिल्याने नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

५. वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते, की नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ प्रायोगिक गटावर राबविलेल्या उपक्रमामुळे झाली यावरुन असे स्पष्ट होते, की आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या स्वत्वाची जाणीव या जीवनविषयक कौशल्यावर चांगला परिणाम झाल्याचे आढळले.

**४) परिणामकारक सुसंवाद विषयक जीवन कौशल्य प्रायोगिक गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य ४.५७ हे नमुना टी मूल्यापेक्षा २.७७ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या सांगीतल्याप्रमाणे चित्रित करा? या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना आपले कान (श्रवणशक्ती), डोळ (दृक्शक्ती) व वाचा (वाकशक्ती) हे अतिशय कार्यक्षम असेल तरच या शक्तीचा योग्यरीतीने विकास होईल, याची जाणीव झाल्याने प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणीपेक्षा उत्तर चाचणी संपादनात अधिक वाढ झाली.

३. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या टेलिफोन गेम या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे या गटातील मुलींनी समजून घेवून ऐकण्याचे महत्व जाणल्याने त्यांची ग्रहणशक्ती वाढली. चित्ताची एकाग्रता वाढली, त्यामुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक शक्ती पडताळल्या गेल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

४. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या ' उपाय शोधा , या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुली भावनिक प्रतिसाद व विचारपूर्वक मिळालेला प्रतिसाद यातील फरक जाणण्यास प्रयत्न करतात. त्यासाठी त्या घटनांचे काळजीपुर्वक निरीक्षण करतात व त्यानुसार योग्य प्रतिसाद नोंदवतात, भावनांचा प्रतिसादावर होणारा परिणाम शोधतात व

त्यातून योग्य प्रतिसाद नोंदवतात, म्हणून प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणीपेक्षा उत्तर चाचणी संपादनात अधिक वाढ झाली.

५.प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या सांगितल्याप्रमाणे चित्रित करा? या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुली विविध परिस्थितीचे पृथ्थ:करण योग्य प्रकारे कसे करावे, पृथ्थ:करण केलेली माहिती प्रभावीपणे कशी मांडता येईल, आपले विचार अधिक चांगल्या पद्धतीने कसे व्यक्त करता येतील यासाठी विचार करु लागल्याने, प्रयत्नशील राहिल्याने प्रायोगिक गटातील मुलींच्या उत्तर चाचणी संपादनात पूर्व चाचणी संपादनापेक्षा लक्षणीय वाढ झाली.

**५) परिणामकारक सुसंवाद विषयक जीवन कौशल्य नियंत्रित गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ०.४७ हे नमुना टी मूल्यापेक्षा (२.७७) कमी आहे. म्हणून ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक नाही, म्हणून वरील शून्य परिकल्पना स्विकारावी लागली.

२) नियंत्रित गटाच्या परिणामकारक सुसंवाद विषयक पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मध्यमानातील फरक सार्थक नसल्याने नियंत्रित गटाला आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या मात्रेचा अभाव असल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली नसल्याचे आढळले.

**६) स्वत्वाची जाणीवविषयक जीवन कौशल्य प्रायोगिक गट व नियंत्रित गट उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ४.४७ हे नमुना टी मूल्य २.६८ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटवर राबविण्यात आलेल्या सांगीतल्याप्रमाणे चित्रित करा? या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुलींना आपले कान(श्रवनशक्ती), डोळे(दृक्शक्ती) व वाचा(वाकशक्ती) हे अतिशय कार्यक्षम असेल तरच मनाचा योग्यरीतीने विकास होईल, याची

जाणीव झाल्याने प्रायोगिक गटाचे संपादनात नियंत्रित गटातील संपादनापेक्षा अधिक वाढ झाली.

३.प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या टेलिफोन गेम या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे या गटातील मुलींनी समजून घेवून ऐकण्याचे महत्व जाणल्याने त्यांची ग्रहणशक्ती वाढली. चित्ताची एकाग्रता वाढली, त्यामुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक शक्ती पडताळल्या गेल्याने त्यांच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली.

४. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या ' उपाय शोधा , या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुली भावनिक प्रतिसाद व विचारपूर्वक मिळालेला प्रतिसाद यातील फरक जाणण्यास प्रयत्न करतात. त्यासाठी त्या घटनांचे काळजीपुर्वक निरीक्षण करतात व त्यानुसार योग्य प्रतिसाद नोंदवतात, भावनांचा प्रतिसादावर होणारा परिणाम शोधतात व त्यातून योग्य प्रतिसाद नोंदवितात, त्यामुळे त्यांच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली.

५.प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या सांगितल्याप्रमाणे चित्रित करा? या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमातून प्रायोगिक गटातील मुली विविध परिस्थितीचे पृथ्थःकरण योग्य प्रकारे कसे करावे, पृथ्थःकरण केलेली माहिती प्रभावीपणे कशी मांडता येईल, आपले विचार अधिक चांगल्या पद्धतीने कसे व्यक्त करता येतील यासाठी विचार करु लागल्याने, प्रयत्नशील राहिल्याने नियंत्रित गटापेक्षा प्रायोगिक गटाच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली.

६. वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते, की नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ प्रायोगिक गटावर राबविलेल्या उपक्रमामुळे झाली म्हणून आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या परिणामकारक सुसंवाद या जीवनविषयक कौशल्यावर चांगला परिणाम झाल्याचे आढळले.

**७) निर्णय क्षमता विषयक जीवन कौशल्य प्रायोगिक गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य ४.२९ हे नमुना टी मूल्य २.७७ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक असल्याने शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या निर्णय क्षमता या कौशल्यावर आधारित प्रसंग वर्णन या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील विद्यार्थिनी एखादा प्रसंग समोर आल्यानंतर त्याच्यावर कशा पद्धतीने विचार करावा, निर्णय घेताना योग्य निर्णय घेण्याची योग्यता निर्माण होण्यासाठी काय करावे, गोंधळलेल्या अवस्थेत सुद्धा योग्य मार्ग शोधून काढण्याची क्षमता कशी निर्माण करावी. यावर सतत विचार करुन त्यासाठी प्रयत्नशील राहिल्याने प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणी संपादनापेक्षा उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय फरक आढळून आला.

३. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली भावनिक निर्णय व विचार पुर्वक घेतलेला निर्णय यातील फरक जाणून घेवून योग्य वेळी योग्य निर्णय कोणत्या पद्धतीने घेता येईल, याचा विचार करु लागल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनात वाढ झाली.

४. प्रायोगिक गटाला दिलेल्या प्रयोग मात्रेमुळे मुली या एखादा निर्णय घेण्याची वेळ आल्यानंतर तो निर्णय घेताना नेमकी समस्या काय, भोवतालची परिस्थिती, उपलब्ध असलेले पर्याय, त्याचा स्वतःवर व इतरांवर होणारा परिणाम यांच्या विचार करु लागल्याने त्यांच्या स्वतः संबंधीचे निर्णय स्वतः घेण्याची प्रवृत्ती वाढ झाल्याने प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणी संपादनापेक्षा उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय फरक आढळून आला.

**८) निर्णय क्षमताविषयक जीवन कौशल्य नियंत्रित गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य ०.१७ हे नमुना टी मूल्यापेक्षा २.७७ कमी आहे. म्हणून ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक नाही म्हणून वरील शून्य परिकल्पना स्विकारावी लागली.

१) नियंत्रित गटाच्या निर्णय क्षमताविषयक पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मध्यमानातील फरक सार्थक नसल्याने नियंत्रित गटाला आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या मात्रेचा अभाव असल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली नसल्याचे आढळले.

**९) निर्णय क्षमता विषयक जीवन कौशल्य प्रायोगिक गट व नियंत्रित गट उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य ४.२९ हे नमुना टी मूल्य २.६८ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक आहे, म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेलया निर्णय क्षमता या कौशल्यावर आधारित प्रसंग वर्णन या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील विद्यार्थिनी एखादा प्रसंग समोर आल्यानंतर त्याच्यावर कशा पद्धतीने विचार करावा, निर्णय घेताना योग्य निर्णय, योग्यता निर्माण होण्यासाठी काय करावे, गोंधळलेल्या अवस्थेत सुद्धा योग्य मार्ग शोधून काढण्याची क्षमता कशी निर्माण करावी. यावर सतत विचार करुन त्यासाठी प्रयत्नशील राहिल्याने प्रायोगिक गटाच्या संपादनात नियंत्रित गटाच्या संपादनाच्या तुलनेत अधिक वाढ झाली.

३. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली भावनिक निर्णय व विचार पुर्वक घेतलेला निर्णय यातील फरक जाणून घेवून योग्य वेळी योग्य निर्णय कोणत्या पद्धतीने घेता येईल, याचा विचार करु लागल्याने प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणी संपादनात वाढ झाली.

४. प्रायोगिक गटाला दिलेल्या प्रयोग मात्रेमुळे मुली या एखादा निर्णय घेण्याची वेळ आल्यानंतर तो निर्णय घेताना समस्या नेमकी काय, भोवतालची परिस्थिती, उपलब्ध असलेले पर्याय, त्याचा स्वतःवर व इतरांवर होणारा परिणाम यांच्या विचार करु लागल्याने त्यांच्या स्वतः संबंधीचे निर्णय स्वतः घेण्याची प्रवृत्ती वाढल्याने प्रायोगिक गटाच्या संपादनात नियंत्रित गटाच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाल्याने आढळून आले.

5. वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते, की नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ प्रायोगिक गटावर राबविलेल्या उपक्रमामुळे झाली त्यामुळे आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या निर्णयक्षमता या जीवनविषयक कौशल्यावर चांगला परिणाम झाल्याचे आढळले.

**१०) समस्या निराकरण विषयक जीवन कौशल्य प्रायोगिक गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१. प्राप्त टी मूल्य ४.८१ हे नमुना टी मूल्य २.७७ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या स्वातीची गोष्ट या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुलींची स्वतःच्या समस्या विशद करुन सांगण्याची मानसिक तयारी झाल्याने प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणीपेक्षा उत्तर चाचणी संपादनात अधिक वाढ झाली.

३. प्रायोगिक गटावर राबविलेल्या प्रयोगामुळे प्रायोगिक गटातील मुलींमध्ये समस्या सोडविण्यास स्वतःहून पुढाकार घेण्याची वृत्तीची वाढ झाली व विकास ही झाल्याने प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणीपेक्षा उत्तर चाचणी संपादनात अधिक वाढ झाली.

४. प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली स्वतःचे प्रश्न व समस्या मांडण्याचा प्रयत्न करु लागल्या,

आवश्यक तेथे विचारविनिमय करु लागल्या, एकमेकांशी संवाद साधू लागल्या, त्यामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्वचाचणीपेक्षा उत्तर चाचणी संपादनात अधिक वाढ झाली.

**११) समस्या निराकरण विषयक जीवन कौशल्य नियंत्रित गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ०.२८ हे नमुना टी मूल्य २.७७ पेक्षा कमी आहे. म्हणून ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक नसल्याने वरील शून्य परिकल्पना स्विकारावी लागली.

२) नियंत्रित गटाच्या समस्या निराकरण विषयक पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मध्यमानातील फरक सार्थक नसल्याने नियंत्रित गटाला आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या मात्रेचा अभाव असल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली नसल्याचे आढळले.

**१२) समस्या निराकरण विषयक जीवन कौशल्य प्रायोगिक व नियंत्रित गट उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ५.४१ हे नमुना टी मूल्य २.६८ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२) प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या स्वातीची गोष्ट या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुलींची स्वतःच्या समस्या विशद करुन सांगण्याची
मानसिक तयारी झाल्याने, समस्या सोडविण्यास स्वतःहून पुढाकार घेण्याची वृत्तीची वाढ झाली त्या वृतीचा विकास ही झाल्याने नियंत्रित गटापेक्षा प्रायोगिक गटाच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली.

३) प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीव विषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली स्वतःचे प्रश्न वा समस्या मांडण्यचा प्रयत्न करु लागल्या, आवश्यक तेथे विचारविनिमय करु लागल्या, एकमेकांशी संवाद साधू लागल्या, त्यामुळे त्यांच्या संपादनात नियंत्रित गटाच्या तुलनेने लक्षणीय वाढ झाल्याचे आढळले.

4) वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते, की नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ प्रायोगिक गटावर राबविलेल्या उपक्रमामुळे झाली त्यामुळे आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या समस्यानिराकरण या जीवनविषयक कौशल्यावर चांगला परिणाम झाल्याचे आढळले.

**१३) सर्जनशीलता विषयक जीवन कौशल्य प्रायोगिक गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१) प्राप्त टी मूल्य ४.३६ हे नमुना टी मूल्य २.७७ पेक्षा अधिक असल्याने ते ०.०१ या सार्थकता स्तरावर सार्थक आहे म्हणून वरील शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२) प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमाच्या अंतर्गत सर्जनशीलताविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली मूळ विचार समजून घेणे, नवनवीन विचारांचा मागोवा घेणे,या कृती करु लागल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादना वाढ झाली, म्हणून ही वाढ उपक्रमांच्या मात्रेमुळे झाली असे आढळले.

३) प्रायोगिक गटातील मुलींना सतत नवीन कल्पना करायला प्रोत्साहन मिळाल्याने त्या मनाने मोकळ्या व आनंदी राहू लागल्याने प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणी संपादनात पूर्व चाचणीपेक्षा लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ उपक्रमांच्या मात्रेमुळे झाली असे म्हणता येईल.

४) प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमाच्या अंतर्गत सर्जनशीलताविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली वर्तमान समस्येबाबत अधिक उपयुक्त संकल्पनांचा अवलंब करु लागल्यने,मुक्त अनुभवास सामोरे जावू लागल्याने त्यांच्या उत्तर चाचणी संपादनापेक्षा पूर्व चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

**१४) सर्जनशीलता विषयक जीवन कौशल्य नियंत्रित गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१)  प्राप्त टी मूल्य ०.०९ आहे. प्राप्त टी मूल्य ०.०९ हे नमुना टी मूल्य २.७७ पेक्षा कमी आहे. म्हणून ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक नसल्याने वरील शून्य परिकल्पना स्विकारावी लागली.

२) नियंत्रित गटाच्या सर्जनशीलता विषयक पूर्व चाचणी व उत्तर चाचणी मध्यमानातील फरक सार्थक नसल्याने नियंत्रित गटाला आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या मात्रेचा अभाव असल्याने त्यांच्या संपादनात वाढ झाली नसल्याचे आढळले.

**१५) सर्जनशीलता विषयक जीवन कौशल्य प्रायोगिक व नियंत्रित गट पूर्व- उत्तर चाचणी परीक्षणावरुन काढलेले निष्कर्ष -**

१)  प्राप्त टी मूल्य ४.३० हे नमुना टी मूल्य २.६८ पेक्षा अधिक आहे असल्याने ते ०.०१ सार्थकता स्तरावर सार्थक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागला.

२)  प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमाच्या अंतर्गत सर्जनशीलताविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली मूळ विचार समजून घेणे, नवनवीन विचारांचा मागोवा घेणे,या कृती करु लागल्याने, मुलींना सतत नवीन कल्पना करायला प्रोत्साहन मिळाल्याने त्या मनाने मोकळ्या व आनंदी राहू लागल्याने प्रायोगिक गटाच्या संपादनात नियंत्रित गटापेक्षा अधिक वाढ झाली म्हणून ही वाढ उपक्रमांच्या मात्रेमुळे झाली असे आढळले.

४)  प्रायोगिक गटावर राबविण्यात आलेल्या आरोग्य जाणीवविषयक उपक्रमाच्या अंतर्गत सर्जनशीलताविषयक उपक्रमामुळे प्रायोगिक गटातील मुली वर्तमान समस्येबाबत अधिक उपयुक्त संकल्पनांचा अवलंब करु लागल्यने, मुक्त अनुभवास सामोरे जावू लागल्याने नियंत्रित गटापेक्षा प्रायोगिक गटाच्या उत्तर चाचणी संपादनात लक्षणीय वाढ झाली.

5. वरील निष्कर्षावरुन असे स्पष्ट होते, की नियंत्रित गटातील मुलीपेक्षा प्रायोगिक गटातील मुलींच्या संपादनात लक्षणीय वाढ झाली आणि ही वाढ प्रायोगिक गटावर राबविलेल्या

उपक्रमामुळे झाली यावरुन असे स्पष्ट होते, की आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुलींच्या सर्जनशीलता विषयक जीवन कौशल्य संपादनावर चांगला परिणाम होतो.

## ६.3 शिफारशी

संशोधिकेने प्रायोगिक गटावर आरोग्य जाणीव विषयक उपक्रम राबविलेले आहेत. नियंत्रित गटावर आरोग्य जाणीव विषयक उपक्रम राबविलेले नाहीत. दोन्ही गटांना प्रकल्पपूर्व व प्रकल्पोत्तर चाचणी दिलेली आहे. प्रायोगिक गटावर आरोग्य जाणीव विषयक राबविल्यामुळे त्यांच्या गुणांमध्ये पडलेल्या फरकावरुन संशोधिकेने पुढील शिफारशी मांडल्या आहेत.

१. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांची योग्य रीतीने प्रत्येक विद्यालयामध्ये कार्यवाही करावी.

२. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांमध्ये सर्व विद्यार्थिनींना समाविष्ट करुन घ्यावे.

३. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांच्या अंतर्गत जीवन कौशल्यशिक्षण हे प्रत्येक प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालय या ठिकाणी देण्यात यावे.

४. आरोग्य जाणीवविषयक उपक्रमांच्या अंतर्गत जीवन कौशल्य शिक्षणासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमामध्ये विविधता आणण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

५. आरोग्य शिक्षण या विषयासाठी स्वतंत्र तासिकेचे नियोजन करण्यात यावे.

६. पौगंडावस्थेतील मुला - मुलींचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी शालेय स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

७. पौगंडावस्थेतील मुला - मुलींच्या आरोग्य संवर्धनाविषयी पालक वर्गात जागृकता निर्माण करण्यासाठी पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे.

८. ग्रामीण भागामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून आरोग्य विषयक माहिती सत्रे, संपर्क सत्रे, तपासणी, हे कार्यक्रम शाळा, महाविद्यालयातून राबविले जावेत.

९. ग्रामीण भागातील मुलीप्रमाणे मुलांसाठीही आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांच्या अंतर्गत जीवन कौशल्य शिक्षण दिले जावे.

१०. सरकार राबवित असलेल्या ग्रामीण आरोग्य अभियानांर्तगत विविध कार्यक्रमांचे आयोजन, शाळा व गावामध्ये करण्यात यावे.

११. पौगंडावस्थेतील आरोग्यसंवर्धन हा युनिसेफ राबवित असलेला उपक्रम अतिशय स्तुत्य आहे, परंतु त्यांची सर्व स्तरावर योग्य पद्धतीने अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

१२. प्राथमिक, माध्यमिक,उच्च माध्यमिक स्तरावरील मुलांना त्यांच्यातील विविध क्षमतांचा विकास करण्याची तसेच व्यक्तीमत्त्व विकासाच्या संदर्भात त्यांच्या बलस्थानांची ओळख करुन देण्यासाठी जीवन कौशल्य शिक्षण देण्यात यावे.

१३. नवीन ज्ञान संपादन करणे केवळ हेच शिक्षणाचे उद्दिष्ट नसून जीवनाला विशिष्ट आकार आणि दर्जा प्राप्त करुन देणाऱ्या अंतर्गत क्षमतांचा विकास व गरज असलेल्या व्यावहारीक कौशल्यांचा गरजेनुसार विकास करणे, अंतर्गत शक्तींचा मानसिक व सामाजिक स्तरावर विकास करण्यासाठी सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना जीवन कौशल्य शिक्षण दिले जावे.

१४. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील मुलांच्यामध्ये शालेय अभ्यासक्रमा बरोबर अभ्यासोत्तर कार्यक्रमांचे आयोजन केले जावे.

१५. जागतिक पातळीवरील अनेक समस्यांचे ज्ञान, स्पर्धात्मक परीक्षा, दर्जाविषयीची विविध आव्हाने यांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य निर्माण करण्यासाठी सर्व स्तरावरील मुलांना जीवन कौशल्य शिक्षण देण्यात यावे.

१६. सर्व स्तरावरील मुलांमध्ये जीवन कौशल्य रुजविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात यावे.

## ६.४ पुढील संशोधनासाठी विषय.

१. जीवन कौशल्य विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुली व शहरी पौगंडावस्थेतील मुली यांच्या जीवन कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.

२. ग्रामीण भागातील व शहरी भागातील १२ ते १८ वयोगटातील पौगंडावस्थेतील मुला मुलींच्या समस्यांचा अभ्यास.

३. आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा ग्रामीण भागातील पौगंडावस्थेतील मुला मुलींच्या स्वत्वाची जाणीव या जीवनविषयक कौशल्य संपादनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.

४. वरील विषया प्रमाणे आरोग्य जाणीव विषयक उपक्रमांचा परिणाकारक सुसंवाद, चिकित्सक विचार, निर्णय क्षमता, सर्जनशील विचार, ताणतणावाचे समायोजन, समस्या निराकरण, या कौशल्यावर होणरा परिणाम अभ्यासता येईल.